## सर्व शिक्षा अभियान

# सेतू शाळा (अनिवासी व निवासी)







## सेतू शाळा (अनिवासी)

### उद्दिष्टे :-

ज्या मुलांनी मधूनच शाळा सोडली असेल, शाळेपासून दूर असतील किंवा कोणत्याही कारणाने शिक्षणात खंड पडला असेल, त्या मुलांना काही महिन्यांकरिता शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे, त्यानंतर नियमित शाळेत दाखल करणे.

### लाभार्थी :-

- १० ते २० या संख्येने मुले आपल्या निवास स्थानापासून दररोज ये-जा करु शकतात,
- ९ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुले.

### योजनेची अंमलबजावणी :-

- स्थानिक स्वराज्य संस्था (ग्राम शिक्षण संस्था, वॉर्ड शिक्षण समिती),
- पंजीकृत स्वयंसेवी संस्था.

### कालावधी :- चार महिने.

### स्वयंसेवक :-

- शक्यतो स्थानिक, १२ वी पास, डी.एड्. महिलांना प्राधान्य.
- संनियंत्रण, पर्यवेक्षण व शैक्षणिक मूल्यमापन :-
- गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, पर्यायी शिक्षण विषयतज्ज्ञ, इ. यांच्याकडून निरीक्षण, मार्गदर्शन व संनियंत्रण.

## मूळ शैक्षणिक प्रवाहात दाखल करणे :-

- परीक्षण करुन क्षमतेनुरुप प्रवेश,
- वर्षातील कोणत्याही महिन्यात प्रवेश देता येऊ शकतो.

## अनुधावन :-

- मुलांना शाळेत दाखल केल्यानंतर स्वयंसेवक दोन महिन्यापर्यंत अनुधावन करेल,
- मुलांना शाळेत टिकवून ठेवण्याची जबाबदारी स्वयंसेवक व मुख्याध्यापकांवर.

# सेतू शाळा (निवासी)

## उद्दिष्टे :-

- ज्या मुलांनी मधूनच शाळा सोडली असेल,
- शाळेपासून दूर गेली असतील किंवा कोणत्याही कारणाने शिक्षणात खंड पडला असेल त्या मुलांना काही महिन्यांकरिता शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे, त्या-नंतर नियमित शाळेत दाखल करणे.

## लाभार्थी :-

- ९ ते १४ वयोगटातील विखुरलेली शाळाबाह्य मुले,
- नैसर्गिक अडथळयांमुळे व शाळेत दाखल करण्यास उशीर झालेली मुले,
- शाळा सोडून काही कालावधी झालेल्या मुलांसाठी,
- किमान विद्यार्थी संख्या - १० ते २०.

## योजनेची अंमलबजावणी :-

- ग्राम शिक्षण समिती,
- वॉर्ड शिक्षण समिती,
- पंजीकृत स्वयंसेवी संस्था.

## निसावी स्वरुपाचे केंद्र :-

- केव्हाही सुरु करता येते,
- केंद्र सुरु झाल्यापासून १०० दिवसांचा कालावधी,
- मुलाना सकाळी व दिवसा पर्यवेक्षित अभ्यास, मार्गदर्शन,
- रात्री अभ्यासासह मनोरंजन, खेळ, मार्गदर्शन

## भोजन व्यवस्था :-

मुलांना चहा, नाश्ता व दोन वेळचे भोजन मोफत.

## स्वयंसेवक व परिचर :-

- दोन स्वयंसेवक नेमता येतात
- अर्हता १२ वी पास, शक्यतो डी.एड्.
- स्थानिक उमेदवार,
- स्त्री उमेदवार किंवा सेवानिवृत्त शिक्षक असल्यास प्राधान्य.

## संनियंत्रण, पर्यवेक्षण व शैक्षणिक मूल्यमापन :-

गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, पर्यायी शिक्षण विषयतज्ज्ञ, इ. यांच्याकडून निरीक्षण, मार्गदर्शन व संयित्रण.

## मूळ शैक्षणिक प्रवाहात दाखल करणे :-

- केंद्र कालावधी संपल्यानंतर रितसर परीक्षण करुन वयानुरुप, क्षमतेनुरुप प्रवेश दिला जातो,
- वर्षातील कोणत्याही महिन्यात प्रवेश देता येऊ शकतो.




